परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/१/कावि/ ५९३ /२०२२
दिनांक- २५/०९/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक / प्र.मुख्याध्यापक
सर्व माध्यमिक विद्यालये

विषय – शिपाई / प्रयोगशाळा परिचर कर्मचारी कामकाजाबाबत...

माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. विद्यालयांचे कामकाजाचे नियंत्रण माध्यमिक शिक्षण मुख्य कार्यालय करते. विद्यालयातील शिपाई कर्मचा-यांना कार्यालयातील टपाल घेवून जाणे व इतर कामकाजासाठी जिल्हा परिषद,उपसंचालक कार्यालय,संबंधित विद्यालयाच्या भागशाळा व इतर विद्यालयांशी संबंधित कार्यालयांमध्ये जाणे आवश्यक आहे.

परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यालयातील शिपाई / प्रयोगशाळा परिचर कर्मचारी यांच्यावर विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचे नियंत्रण दिसुन येत नाही. विद्यालयातील शिपाई कर्मचारी सकाळी थम्ब व हजेरी पत्रकावर स्वाक्षरी करून विद्यालयीन तमेच कार्यालयीन वेळेत विद्यालयात उपस्थित न राहता इतरत्र फिरत असतात. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून कार्यालयीन व शैक्षणिक दृष्ट्या अडथळा निर्माण करणारी आहे. याबाबत विद्यालयाचे मुख्याध्यापक मुख्य कार्यालयात तोंडी तक्रारी करतात. परंतु, शिपाई / प्रयोगशाळा परिचर कर्मचारी यांच्यावर कारवाई केल्याचे दिसुन येत नाही. शिपाई / प्रयोगशाळा परिचर कर्मचारी यांच्या वरील वर्तनामुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व मुख्याध्यापक व प्रभारी मुख्याध्यापकांना सूचित करण्यात येते की, विद्यालयातील शिपाई कर्मचारी यांना टपाल व इतर कामकाज नेमून देण्यात यावे.तसेच प्रयोगशाळा परिचर यांना त्यांच्या संबंधीत कामकाज नसल्यास मनपा नियमाप्रमाणे वर्ग-४ पदाचे कामकाज देण्यात यावे. त्याबाबत विद्यालयीन स्तरावर दप्तरी आदेश काढणेत येवून, त्यावर संबंधितांची स्वाक्षरी पोहोच घेणेत येवून, त्याची एक प्रत मुख्य कार्यालयास पाठविणेची दक्षता घेणेत यावी.त्यानंतर कोणत्याही कर्मचा-यांनी नेमून दिलेले कामकाजात टाळाटाळ केल्यास व विद्यालयात पुर्ण वेळ न थांबल्यास, त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करणेत यावी. तमेच कारवाई केलेबाबतचा अहवाल मुख्य कार्यालयात पाठविणेत यावा.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचा-यांवर कारवाई न केल्यास संबंधित मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई करणेत येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(संदीप खोत)
उप-आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८.